**विशेष दिवाणी दरखास्त क्रमांक ३५/२०२२**
(सीएनआर क्र.एमएचएएच०८-००५७२-२०२२)

**<u>निशाणी क्रमांक १४ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज धनको यांनी ऋणको क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी जो विलंब झाला आहे तो माफ होवुन मिळावा आणि उपशम आदेश बाजूला सारण्यात यावा यासाठी दाखल केलेला आहे.

२. धनका यांचे अर्जातील कथन थोडक्यात असे :- प्रस्तुत दाव्यातील ऋणका क्र.१ हे दिनांक १३.०३.२०२१ रोजी मयत झाले आहेत. ऋणको क्र.१ चे वारस अभिलेखावर घेणे कामी विलंब झालेला आहे. मयत ऋणको क्र.१ च्या वारसांना प्रस्तुत दाव्यामध्ये त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे तसेच सदर अर्जाचा न्यायनिर्णय गुणवत्तेवर होण्यासाठी त्यांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्याकरिता अर्जामध्ये नमुद केलेले वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात यावी तसेच याकामी झालेला विलंब माफ करण्यात यावा आणि झालेला उपशम आदेश बाजूला सारण्यात यावा अशी विनंती धनकोंनी केली आहे.

३. ऋणकोंनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल करून सक्त हरकत नोंदवली आहे. ऋणको त्यांचे म्हणण्यामध्ये असे कथन करतात की, अर्जास पुरेसे कारण नाही तसेच झालेल्या विलंबाचे अर्जातील नमुद कारण संयुक्तिक नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती ऋणका यांनी केलेली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले, तसेच दाखल कागदपत्रे पडताळुन पाहिली असता असे दिसुन येते की, धनको यांनी सदरचा दरखास्त वसुलीकरिता आणली आहे. प्रस्तुत दाव्यातील ऋणको क्र.२ हे दिनांक १३.०३.२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे वारस अभिलेखावर घेणे विलंब झालेला आहे. मयत ऋणको क्र.१ च्या वारसांना प्रस्तुत अर्जाकामी त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. ऋणको क्र.१ यांचे मृत्यूनंतर, ९० दिवसांचे आत सदरचा अर्ज दाखल करणे गरजेचे होते, परंतु त्याकामी उशिर झाला

आहे. सदरचा विलंब हा धनकोंनी जाणीवपुर्वक केलेला नाही, परंतु विलंब झालेला आहे ही बाब नाकारता येणार नाही, त्यामुळे धनकोंवर खर्च लादुन अर्ज मंजुर करणे न्यायाचे दृष्टीने योग्य होईल असे मला वाटते, सबब खर्च लादुन अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे, त्या बाबतचा सविस्तर आदेश खालीलप्रमाणे पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. मयत ऋणको क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी जो विलंब झाला आहे तो माफ करण्यात येतो आणि त्यांच्याविरुध्द झालेला उपशम आदेश बाजूला सारण्यात येतो.

BABAR SANGITA PUNDLIK

Digitally signed by BABAR SANGITA PUNDLIK
Date: 2025.04.23 17:39:45 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- २३.०४.२०२५.

(श्रीमती. एस. पी. बाबर)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.